# लठ्ठपणामुळे नेत्रविकार होण्याची शक्यता



आरोग्य वार्ता

**शिकागो :** लठ्ठपणा, शरीरात वाढलेली अतिरिक्त चरबी यांमुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागते. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, मेंदुज्वर यांपासून रक्तवाहिन्यांसंबंधी आजार लठ्ठपणामुळे होऊ शकतात. मात्र लठ्ठपणामुळे डोळ्यांचेही अनेक आजार होऊ शकतात, असा दावा कॅनडातील संशोधकांनी केला आहे. लठ्ठपणामुळे होणाऱ्या आजारांकडे दुर्लक्ष केल्यास प्रसंगी अंधत्वही येऊ शकते, असे या संशोधकांनी सांगितले.

मॉन्ट्रियल येथे हे संशोधन करण्यात आले आहे. लठ्ठपणामुळे रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होतो आणि वयानुसार डोळ्यांना हानी पोहोचू शकते. लठ्ठ व्यक्तींना वयानुसार मॅक्युलर डीजेनरेशन, मोतीबिंदू, काचबिंदू आणि डायबेटिक रेटिनोपॅथी, फ्लॉपी आयलिड सिंड्रोम, रेटिनल व्हेन ऑक्लुजन आदी नेत्रविकार होऊ शकतात. याबाबतची कारणे सांगताना संशोधकांनी सांगितले की, डोळ्यांना रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा आल्यामुळे हे नेत्रविकार होण्याची शक्यता असते. लठ्ठ व्यक्तींमध्ये रक्तवाहिन्यांसंबंधी विकार असतात.

रक्तामध्ये साखरेचे प्रमाण वाढल्यानंतरही रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. डोळ्यांना ऑक्सिजन आणि इतर पोषक द्रव्ये यांचा पुरवठा कमी होत असल्याने या प्रकारचे नेत्रविकार होऊ शकतात, असे या संशोधकांनी सांगितले.




# पुण्यात ४० प्रेमीयुगुलांची विवाहासाठी नोंदणी

## प्रेमदिनाचे औचित्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विवाहाचे बंधन गुंफताना पारंपरिक पद्धतीने मुहूर्त पाहण्याबरोबरच प्रेम दिवस व्हॅलेन्टाइन डे, नाताळ आणि विशेष दिवस असे काही खास दिवस तरुणाई शोधत असते. दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ फेब्रुवारी या प्रेम दिनाचे औचित्य साधत पुण्यातील ४० प्रेमीयुगुलांनी नोंदणी पद्धतीने विवाह करण्यासाठी शहर विवाह नोंदणी कार्यालयात पूर्वनोंदणी केली आहे.

प्रेम व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे प्रेमदिवस दरवर्षी १४ फेब्रुवारीला साजरा केला जातो. हा मुहूर्त साधत विवाह करण्यास प्रेमीयुगल प्राधान्य देतात. मंगळवारी नोंदणी पद्धतीने विवाह करण्यासाठी शहर विवाह नोंदणी कार्यालयात सुमारे ४० प्रेमी युगलांनी पूर्वनोंदणी केली आहे. पत्रिका आणि मुहूर्त पाहून विवाह करण्याकडे अनेकांचा कल असतो. त्याबरोबरच नोंदणी पद्धतीने विवाह (रजिस्टर्ड मॅरेज) करणाऱ्यांचीही संख्या वाढत आहे. नवी पिढी पत्रिकेवर फारसा विश्वास ठेवत नसल्याने आपल्या सोयीप्रमाणे विवाह नोंदणी कार्यालयात जाऊन लग्न केले जाते. या कार्यालयात नोंदणी करून होणारे विवाह विशेष विवाह कायद्यानुसार होतात. त्यामध्ये जात, धर्माचा अडथळा नसतो. विवाहाच्या वेळी किचकट प्रक्रियाही नसल्याने नोंदणी करून विवाह करण्याचे प्रमाण वाढत आहे.

दरम्यान, लग्नगाठ बांधण्यासाठी प्रेमी युगल प्रेमदिवसाला प्राधान्य देतात. १४ फेब्रुवारी या दिवशी विवाह करण्यासाठी सुमारे एक-दीड महिन्यांपूर्वीच पूर्व नोंदणी शहर विवाह नोंदणी कार्यालयात करण्यात आली आहे. १४ फेब्रुवारीला शासकीय मुद्रणालय (फोटोझिंको) येथील विवाह नोंदणी कार्यालयात नोंदणी पद्धतीने विवाह करण्यासाठी मोठी गर्दी होते.



### विवाहाचे प्रमाणपत्र जागेवरच

मुंबई, मुंबई उपनगर आणि पुणे अशा तीन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र विवाह नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. विवाह नोंदणी अधिकाऱ्यांकडे नोटीस आणि त्यासाठी आवश्यक पुराव्यांची कागदपत्रे जमा केल्यानंतर ३० दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारचा आक्षेप न आल्यास वधू आणि वर तीन साक्षीदारांसमक्ष अधिकाऱ्यांसमोर विवाह करू शकतात. विवाहाचे प्रमाणपत्रही लगेच देण्याची व्यवस्था दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात आली आहे.




# कोयता गँगमधील तिघे अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** हडपसर भागात दहशत माजविणाऱ्या कोयता गँगमधील दोघांना पोलिसांनी शिरुर तालुक्यातील पाबळ गावात पकडले. पोलिसांना पाहताच उसाच्या फडातून पसार झालेल्या दोघांना पाठलाग करून पोलिसांनी ताब्यात घेतले. कोयता गँगमधील आणखी एकाला नगर जिल्ह्यातील पाथर्डी परिसरातून अटक केली.

कोयता गँगचा म्होरक्या स्वप्नील उर्फ बिट्ट्या संजय कुचेकर (वय २२ रा. मांजरी, हडपसर), पंकज गोरख वाघमारे (वय २८, रा. बंटर स्कूलजवळ, हडपसर), सत्यम विष्णू भोसले (रा. हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. ३ जानेवारी रोजी मांजरी परिसरात दरोडा आणि खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोयता गँगचा म्होरक्या बिट्ट्या कुचेकर आणि पंकज वाघमारे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून ते पसार झाले होते. पोलिसांना ते गुंगारा देत होते. दोघे जण शिरुर तालुक्यातील पाबळ गावात येणार असल्याची माहिती हडपसर पोलिसांच्या पथकाला मिळाली.

त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी निखिल पवार, समीर पांडुळे, शाहिद शेख, प्रशांत दुधाळ पाबळला गेले. पोलिसांना पाहताच उसाच्या शेतातून कुचेकर आणि वाघमारे पसार झाले. पोलिसांनी पाठलाग करून दोघांना पकडले.

दरम्यान, कोयता गँगमधील सत्यम भोसलेला पोलिसांच्या पथकाने नगर जिल्ह्यातील पाथर्डी गावातून अटक केली. पोलीस कर्मचारी चंद्रकात रेजीतवाड आणि अजित मदने यांनी ही कारवाई केली.

# मुलाला खंडणीसाठी जीवे मारण्याची धमकी

## स्वारगेट पोलिसांकडून एकाला अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शाळकरी मुलाला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडून ४५ हजार रुपयांची खंडणी उकळणाऱ्या एकाला स्वारगेट पोलिसांनी अटक केली.

या प्रकरणी सागर श्रवण पवार (वय २८, रा. राजीव गांधीनगर, आंबील ओढा वसाहत) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत सॅलिसबरी पार्क भागात राहणाऱ्या एकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदारच्या शेजारील सोसायटीत आरोपी पवार एका व्यावसायिकाकडे मोटारचालक म्हणून काम करत होता. त्याने तक्रारदाराच्या १४ वर्षांच्या मुलाशी ओळख वाढविली. मी खूप मोठा गुंड आहे. नुकताच कारागृहातून बाहेर आलो आहे. तू घरातून गुपचूप पैसे आणून न दिल्यास तुला पळवून नेऊन जीवे मारू, अशी धमकी पवारने शाळकरी मुलाला दिली होती.

पवारच्या धमकीमुळे घाबरलेल्या मुलाने घरातून गुपचुप ४५ हजार रुपये घेतले. त्याने पवारला पैसे दिले. त्यानंतर चार दिवसांपूर्वी शाळकरी मुलगा सोसायटीच्या पार्किंगमध्ये खेळत होता. त्या वेळी पवारने पुन्हा मुलाला गाठले आणि घरातून २५ हजार रुपये आणून दे, असे सांगितले. मुलगा घरात गेला. त्याने घरातील कपाटातून २५ हजारांची रोकड घेतली. रोकड लपवून निघालेल्या मुलाला त्याच्या आजीने पाहिले. तिने मुलाकडे विचारणा केली. तेव्हा पवारने धमकावून पैसे आणण्यास सांगितल्याचे मुलाने सांगितले. त्यानंतर मुलाच्या वडिलांनी आरोपी पवारला जाब विचारला. तेव्हा त्याने वडिलांशी वाद घालण्यास सुरुवात केली. वडिलांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक इंदलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने पवारला ताब्यात घेतले. पवार याच्या विरुद्ध यापूर्वी एक गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक जगताप तपास करत आहेत.

## वीजचोरीमुळे ३० गुंठे ऊस जळाल्याचे उघड

**नारायणगाव :** आकडा टाकून कृषी पंपाला केलेल्या वीजचोरीच्या घटनेमध्ये ३० गुंठे ऊस जळीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे राकेश दरंदाळे (रा. वाजगे मळा) याच्यावर नारायणगाव पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज ताटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वीज वितरण कंपनीचे सहायक अभियंता ऋषिकेश सुदाम बनसोडे आणि शहर तंत्रज्ञ महादेव माणिक साळुंके यांनी २८ फेबुवारी २०२२ रोजी केलेल्या दैनंदिन तपासणीमध्ये वाजगे मळा गव्हाळी येथे श्रीकांत रभाजी वाजगे यांच्या शेतामध्ये आकडा टाकून कृषी पंपाचा वापर करत असल्याने दिसले. हा आकडा वाजगे यांची जमीन कसत असणाऱ्या राकेश दरंदाळे याने टाकला असल्याचे सांगण्यात आले. या आकड्यामुळे लता वसंत भुजबळ यांचा ३० गुंठे ऊस जळीत झाला. वीज वापरदार राकेश दरंदाळे याने गेल्या वर्षभरात १६३४ युनिट्सची वीज चोरी केली असून महावितरण कंपनीचे १३ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.


## BF INVESTMENT LIMITED

KALYANI

**Regd. Off.:** Mundhwa, Pune Cantonment, Pune- 411036
**CIN : L65993PN2009PLC134021** Tel: +91 77190 05777 Email : secretarial@bfilpune.com Website : www.bfilpune.com

**Extract of Statement of Un-Audited Standalone & Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months Ended 31st Decemnber, 2022**

(₹ in Mln.s)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | | Consolidated | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended |
| | | 31-12-2022 | 30-09-2022 | 31-12-2021 | 31-12-2022 | 31-12-2021 | 31-03-2022 | 31-12-2022 | 30-09-2022 | 31-12-2021 | 31-12-2022 | 31-12-2021 | 31-03-2022 |
| | | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Audited | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Un-Audited | Audited |
| 1 | Total Income from operations | 78.62 | 570.22 | 66.84 | 693.71 | 396.19 | 525.93 | 78.62 | 136.77 | 66.83 | 260.26 | 178.04 | 199.44 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before tax and exceptional and / or Extraordinary items) | 68.82 | 560.41 | 58.73 | 667.29 | 369.79 | 476.53 | 68.82 | 126.96 | 58.72 | 233.84 | 151.64 | 150.04 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after exceptional and / or Extraordinary items) | 68.82 | 560.41 | 58.73 | 667.29 | 369.79 | 476.53 | 774.08 | 683.14 | 506.63 | 1,923.11 | 1,486.37 | 2,634.96 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after exceptional and / or Extraordinary items) | 62.34 | 420.66 | 45.99 | 510.74 | 282.48 | 361.58 | 590.72 | 513.16 | 381.17 | 1,452.13 | 1,118.04 | 1,977.51 |
| 5 | Total Comprehensive income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)] | 2,884.66 | 1,522.27 | (840.82) | 3,190.73 | 3,386.13 | 4,022.23 | 3,410.33 | 1,611.97 | (504.55) | 4,125.31 | 4,214.70 | 7,401.02 |
| 6 | Equity Share Capital | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 | 188.34 |
| 7 | Reserves ( excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of Previous Year.) | | | | | | 19,382.40 | | | | | | 40,188.93 |
| 8 | Earning Per Share (of Rs. 5/- each - not annualised) Basic & Diluted | 1.66 | 11.17 | 1.22 | 13.56 | 7.50 | 9.60 | 15.68 | 13.62 | 10.12 | 38.55 | 29.68 | 52.50 |

**Note :** The above is an extract of the detailed format of Quarterly / Annual Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulations 33 of the SEBI (Listing and other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly / Annual Unaudited Financial Results are available on www.nseindia.com, www.bseindia.com and on the company website www.bfilpune.com.

**For BF Investment Limited**
**B. S. Mitkari**
Director
DIN :03632549

**Place : Pune**
**Date : 13th February, 2023**



## MITCON Consultancy & Engineering Services Limited

MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow

Registered Office: First Floor, Kubera Chambers, Shivajinagar, Pune-411 005, Maharashtra, India
Phone: +91-20-2553 4322, 2553 3309 Email: cs@mitconindia.com Website: www.mitconindia.com
CIN: L74140PN1982PLC026933

**Statement of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Nine Month Period Ended 31st December, 2022** (₹ Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | Nine month | Quarter ended | Quarter ended | Nine month | Quarter ended |
| | | 31/12/2022 | 31/12/2022 | 31/12/2021 | 31/12/2022 | 31/12/2022 | 31/12/2021 |
| | | | (Unaudited) | | | (Unaudited) | |
| 1 | Total income from operations | 1,015.33 | 3,171.82 | 1,085.16 | 1,965.39 | 5,747.44 | 1,750.34 |
| 2 | Net Profit / (Loss) from ordinary activities after tax | 135.11 | 495.46 | 19.33 | 28.66 | 373.99 | 54.86 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items) | 135.11 | 495.46 | 19.33 | 28.66 | 373.99 | 54.86 |
| 4 | Equity Share Capital | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 | 1,342.15 |
| 5 | Total Reserves including non-controlling interest (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | 9,584.69 | 9,584.69 | @ 8920.35 | 9,641.12 | 9,641.12 | @ 8634.58 |
| 6 | Earnings Per Share (before extraordinary items) (of Rs.10/- each) Basic (₹) Diluted (₹) | 1.01 | 3.69 | 0.14 | 0.21 | 2.79 | 0.41 |
| 7 | Earnings Per Share (after extraordinary items) (of Rs.10/- each) Basic (₹) Diluted (₹) | 1.01 | 3.69 | 0.14 | 0.21 | 2.79 | 0.41 |

**Notes:** The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of Financial Results for the quarter and nine month period ended 31st December, 2022 are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com) and Company's website (www.mitconindia.com).
@ - The figures are per Ind AS

For and on behalf of Board of Directors
Sd/-
**Mr. Anand Chalwade**
Managing Director

Place: Pune
Date: 13 February, 2023






## KALYANI INVESTMENT COMPANY LIMITED

KALYANI

CIN : L65993PN2009PLC134196
Registered Office : Mundhwa, PUNE - 411 036 Tel : 91 20 66215000, Fax : 91 20 26821124
Website : www.kalyani-investment.com E-mail : investor@kalyani-investment.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS**
**FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2022**

(₹ in Million)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | | Consolidated | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended | Quarter Ended | | | Nine Months Ended | | Year Ended |
| | | Dec. 31, 2022 Unaudited | Sept. 30, 2022 Unaudited | Dec. 31, 2021 Unaudited | Dec. 31, 2022 Unaudited | Dec. 31, 2021 Unaudited | March 31, 2022 Audited | Dec. 31, 2022 Unaudited | Sept. 30, 2022 Unaudited | Dec. 31, 2021 Unaudited | Dec. 31, 2022 Unaudited | Dec. 31, 2021 Unaudited | March 31, 2022 Audited |
| 1 | Total Income from operations | 126.08 | 390.36 | 117.49 | 539.83 | 323.37 | 392.30 | 126.08 | 374.90 | 117.49 | 524.37 | 284.70 | 307.23 |
| 2 | Profit for the period (before share of net profits of associate, Exceptional items, tax) | 121.07 | 384.45 | 111.56 | 525.12 | 304.81 | 362.33 | 121.07 | 368.99 | 111.56 | 509.66 | 266.14 | 277.26 |
| 3 | Profit for the period before tax (after exceptional item) | 121.07 | 384.45 | 111.56 | 525.12 | 304.81 | 362.33 | 203.89 | 446.88 | 253.31 | 642.60 | 637.10 | 713.13 |
| 4 | Profit for the period after tax | 95.27 | 288.08 | 81.51 | 397.89 | 213.89 | 260.43 | 157.25 | 334.80 | 187.58 | 485.81 | 511.35 | 571.74 |
| 5 | Total Comprehensive Income after tax (comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)) | 10,521.92 | 3,709.02 | (2,609.02) | 11,107.52 | 7,527.86 | 6,917.09 | 10,584.65 | 3,756.45 | (2,503.75) | 11,197.60 | 7,822.83 | 7,231.22 |
| 6 | Equity Share Capital | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 | 43.65 |
| 7 | Other Equity | | | | | | 51,810.72 | | | | | | 53,464.66 |
| 8 | Earnings Per Share : (of ₹ 10/- each) Basic and diluted (not annualised) | 21.82 | 65.99 | 18.67 | 91.15 | 49.00 | 59.66 | 36.02 | 76.70 | 42.97 | 111.29 | 117.14 | 130.97 |

Note : The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as modified by Circular No. CIR/CFD/FAC/62/2016 dated July 5, 2016. The full format of Quarterly Financial Results is available on the websites of Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com and also on Company's website at www.kalyani-investment.com

For KALYANI INVESTMENT COMPANY LIMITED
Amit B. Kalyani
Chairman

Date : February 13, 2023
Place : Pune